# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - ९

## (सभावृत्तांत)

दिनांक – १७/०५/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार,दिनांक १७/०५/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ढंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१४) मा.राजू मिसाळ
१५) मा.अमित राजेंद्र गावडे
१६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.चंद्रकांत इंदलकर-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल,मा.पाटील,मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे,मा.खोसे, मा.दंडवते,मा.लोणकर,मा.बोदडे-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.निकम, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.थोरात, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.घोडे,मा.कांबळे,मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.गायकवाड,मा.भोसले, मा.पाटील-कार्यकारी अभियंता,मा.गाडेकर,मा.मुथा,मा.जाधव-प्रशा.अधिकारी, मा.कोटलवार-माहिती तंत्रज्ञान अधिकारी,मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्र.१२) सांस्कृतिक आणि कला धोरणांतर्गत सन २०१७-१८ मध्ये आयोजित करावयाच्या कार्यक्रमांबाबत- मा.माधुरी कुलकर्णी, मा.आशा धायगुडे-शेंडगे यांचा प्रस्ताव...

विषय क्र.१३) मनपाची सखुबाई गवळी उद्यान व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.अनुराधा गोफणे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

----------

दिनांक २६/०४/२०१७ व दि.०३/५/२०१७ रोजी दु.१.३० वा. झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा,सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ३६७ विषय क्रमांक – १
दिनांक – १७/०५/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/६३/२०१७ दि.२३/३/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील एकूण ४१ स्मशानभूमी/दफनभूमी चे ठिकाणी स्वच्छता व सुरक्षा ठेवणेसाठी काळजीवाहक नेमणेकामी वैद्यकिय विभागामार्फत निविदा नोटिस क्र.१२-२०१२/१३ प्रसिध्द करणेत आली होती. त्यानुसार पात्र ३६ संस्थांना स्मशानभुमी/दफनभुमीचे ठिकाणी ८ तासासाठी र.रु.३०९/- प्रतिदिन प्रति काळजीवाहक या दराने व ०५ धर्मादाय संस्थांकडील काळजीवाहकांना र.रु.७,०७९/- दरमहा या दराने ३ काळजीवाहक पुरविणेचे काम देण्यात आले होते. सदर कामाची मुदत दि.३१/१२/२०१६ रोजी संपुष्टात आल्याने कार्यरत ४१ संस्थाना/ठेकेदारांना दिनांक ०१/०१/२०१७ ते दिनांक ३१/०५/२०१७ पर्यंत अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणे व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.५५,७०,०९७/- (अक्षरी र.रू. पंचावण्ण लाख सत्तर हजार सत्यान्नव फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय**–निविदेमध्ये अशी अट टाकावी की, महापालिकेकडून कंत्राटदारास/ठेकेदारास बील देण्यास काही कारणास्तव उशीर होत असेलतर ठेकेदाराने स्वतः ३ महिन्यांपर्यंत कामगारांना पगार देण्याची व्यवस्था करावी. याकरिता ठेकेदाराकडून बँक स्टेटमेंट आणि बँक वॉरंटी घेण्यात यावी. दि.३१ जूलै २०१७ पर्यंत मुदतवाढ देऊन हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

सर्व विभागप्रमुखांना सूचना आहे की, त्यांचेकडील मुदतवाढीचे जे काही विषय असतील ते सर्व विषय रितसर विषयपत्रिकेवर आणावेत. दि.३१ जुलै पर्यंतच मुदतवाढीचे विषयांना मंजूरी देण्यात येईल.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३६८ विषय क्रमांक – २
दिनांक – १७/०५/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/४/कावि/१२१/२०१७ दि.०३/०४/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील रस्ते, गटर्स यांची दैनंदिन साफसफाई होणे नागरिकांचे आरोग्याशी संबंधीत असुन सदर साफसफाई न झाल्यास नागरिकांचे आरोग्यावर विपरीत परीणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरचे काम बंद करणे उचित होणार नाही. सदर कामाची नविन निविदा कार्यवाही सुरु असुन त्यास काही अवधी लागणार आहे. तरी सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या ६८ (स्वंयरोजगार/बेरोजगार) संस्थाकडून ६ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाईसाठी कार्यरत असलेल्या प्रस्तावात नमुद ९२५ कामगारांचे कामास दि.१/४/२०१७ पासून ४ महिने अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होवुन नवीन संस्थांना नेमणुक आदेश देईपर्यंत या पैकी जी प्रक्रिया प्रथम होईल त्या कालावधीपर्यंत मुदतवाढ देणेस सद्याचा किमान वेतन दर र.रु.१२,३९२.४२ प्रमाणे ९२५ कामगारांचे मासिक खर्च र.रु.१,१४,६२,९८९/- नुसार ४ महिने कालावधीसाठी र.रु.४,५८,५१,९५६/-चे अपेक्षित खर्चास, त्यांचेशी मुदतवाढ कालावधीचा करारनामा करुन कामाचा आदेश देण्यास तसेच प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३६९ विषय क्रमांक – ३
दिनांक – १७/०५/२०१७ विभाग – इ क्षेत्रिय कार्यालय
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/६/कावि/१४७/१७ दि.५/५/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या विद्युत विभागाच्या नि.नो.क्र.3/44-2016-17 मधील अ.क्र.44 अन्वये भोसरी उपविभागाअंतर्गत शाळा कार्यालय इमारतीचे नुतनीकरण करणे व आवश्यकतेनुसार विद्युतीकरण करणेकामी मे.पी.व्ही.आर.एस इलेक्टीकल ऍण्ड इंजि निविदा रक्कम रू.5,99,523/- (अक्षरी र.रु.पाच लाख नव्यान्व हजार पाचशे तेवीस फक्त) पेक्षा 17.00% कमी या ठेकेदारास कामाचा आदेश देणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७० विषय क्रमांक – ४
दिनांक – १७/०५/२०१७ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.फक्षेका/नि/कावि/२४२/१७ दि.८/५/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या फ क्षेत्रीय कार्यालयाकडील नि.नो.क्र.1/105-2016-17 मधील अ.क्र. 1 अन्वये फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण मधील आवश्यक ठिकाणच्या

दिवाबत्ती व्यवस्थेमधील नादुरुस्त खिळन्या दुरुस्त करणे आवश्यक देखभाल दुरूस्ती व इतर आवश्यक विद्युत विषयक कामे करणेकामी सन 2016-17 मे.एन.एस.इले.कार्पोरेशन नि.र.रु.5,60,479/- (अक्षरी र.रु.पाच लाख साठ हजार चारशे एकोणऐंशी फक्त) पेक्षा 10.31% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७१ विषय क्रमांक – ५

दिनांक – १७/०५/२०१७ विभाग – स्थापत्य

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/उद्यान/कावि/१०/२०१७ दि.८/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य उद्यान विभागाकडील नि.नो.क्र. ८२/०१/२०१६-१७ अन्वये बगीचा ग्रीन स्पेसेस (अमृत) प्रभाग क्र.१६ येथे उद्यान विकसित करणेकामी (अमृत योजना) मे.तावरे कन्स्ट्रक्शन & कं. नि.र.रु.१,०३,०८,२४२/- (अक्षरी र.रु.एक कोटी, तीन लाख, आठ हजार, दोनशे बेचाळीस फक्त) पेक्षा २३.०४% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.८३,२९,८८४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** स्थानिक/भारतीय प्रजाती उदा.जांभूळ,पेरू,आवळा,चिंच अशी फळे येणा-या वृक्षांचे रोपण करण्यात यावे. वृक्षारोपणाबाबत जनजागृतीचे कार्यक्रम हाती घेण्यात यावेत. याकामी एनजीओ, बचतगट यांचे सहाय्य घ्यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७२ विषय क्रमांक – ६

दिनांक – १७/०५/२०१७ विभाग – स्थापत्य

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/१९३/१७ दि.९/५/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३८/२९/२०१६-१७ प्रभाग क्र.४३ पिंपरी येथील विविध स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे. एल. एन. एंटरप्रायजेस नि.र.रु.१३,९९,८३०/- (अक्षरी र.रु.तेरा लाख नव्यान्नो हजार आठशे तीस फक्त) पेक्षा १९.००% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.११,९०,५५५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला

असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७३ विषय क्रमांक – ७
दिनांक – १७/०५/२०१७ विभाग – माहिती तंत्रज्ञान
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे जावक क्र.मातंवि/११/कावि/१८२/१७ दि.११/५/२०१७

मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

अनाधिकृत बांधकामाबाबत नियंत्रणासाठी दि. ३१/१२/२०१५ रोजी महापालिका हद्दीतील अस्तित्वात असलेल्या बांधकामाच्या सॅटेलाईट इमेजेस (Updated High Version) केंद्रशासकीय संस्था नॅशनल रिमोट सेनसिंग सेंटर, हैद्राबाद यांचे मार्फत इमेज प्राप्त करुन घेणेत आलेली आहे. सदरची इमेज प्राथमिक स्वरुपाची असल्याने त्यावर प्रोसेसींग करणे आवश्यक आहे. त्यासाठी कोटेशन नोटीस प्रसिद्ध करुन प्राप्त कोटेशन पैकी मे.टेक ९ सर्विसेस यांचे र.रु. १,४८,५००/- (अक्षरी र.रू.एक लाख अठ्ठेचाळीस हजार पाचशे फक्त) हे कमी दर प्राप्त झालेला आहे. सदरचा दर स्विकृत करुन त्यांना कामाचा आदेश देणेस व त्यांचे मार्फत सदर चे काम करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७४ विषय क्रमांक – ८
दिनांक – १७/०५/२०१७ विभाग – वैद्यकिय मुख्य कार्यालय
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/०१/कावि/५०१/२०१७ दि.११/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

खाजगी वैद्यकिय संस्थांमधील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी मनपाचे रुग्णालय संशोधनासाठी /निरीक्षणासाठी उपलब्ध होणेकामी तसेच त्यानुसार होणारी आवश्यक असणारे प्रति विद्यार्थी प्रमाणे दर महा र.रु.५,०००/- (अक्षरी र.रू.पाच हजार फक्त) भरुन मनपाचे रुग्णालयामध्ये विहीत अटी शर्तीनुसार परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७५ विषय क्रमांक – ९
दिनांक – १७/०५/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/१६९/२०१७ दि.११/०५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “अ” क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी उपलब्ध वाहनांवर ५२ वाहन चालक, ३ सुपरवायझर व ९० कामगार पुरविणेकामी ई-निविदा नोटीस

क्र.४/२०१४-१५ प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आल्या होत्या. कामगारांचे वेतन व भत्ते र.रु.१,६२,४१,१३२/- + सेवाशुल्क र.रु.१६,२४,११३/- अशी एकूण र.रु.१,७८,६५,२४५/- एवढी निविदेची अंदाजपत्रकीय किंमत होती. मे. भारतीय महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांनी सेवाशुल्काच्या ९८.५२% कमी दराने (र.रु.२४,०००/-) व एकूण निविदा रकमेच्या ८.९६% कमी दराने निविदा सादर केली होती. सदरचे दर लघुत्तम असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "अ" क्षेत्रीय कार्यालयांतर्गत दिनांक २३/०७/२०१६ अखेर ठेकेदार म्हणून नेमणूक करणेत आली होती. तदनंतर दि.२४/७/२०१६ ते दि.३१/१२/२०१६ पर्यंत व दि.१/१/२०१७ ते दि.३०/४/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस अनुक्रमे मा. स्थायी समिती ठराव क्रं.१६९४२ दिनांक १६/८/२०१६ व ठराव क्रं.२०१३७ दिनांक १०/०१/२०१७ अन्वये मान्यता मिळाली होती. सदर कामाची मुदत दि.३०/०४/२०१७ अखेर संपुष्टात येणार आहे. याकामाची नविन निविदा कार्यवाही सुरु असून, त्यास काही महिने कालावधी लागणार आहे. त्यामुळे मे. भारतीय महिला स्वंयरोजगार सेवा सह. संस्था मर्या. पिंपरी यांची ठेकेदार म्हणून दिनांक १/५/२०१७ ते दिनांक ३१/०८/२०१७ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी होणा-या अंदाजे र.रु.६६,९८,०४०/- अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय**- दिनांक १/५/२०१७ ते दिनांक ३१/०७/२०१७ अखेर मुदतवाढ देणेस व याकामी होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७६ विषय क्रमांक – १०

दिनांक – १७/०५/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/१७०/२०१७ दि.११/०५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "ड" क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन केंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी उपलब्ध वाहनांवर ४७ वाहन चालक, ३ सुपरवायझर व ९४ कामगार पुरविणेकामी ई-निविदा नोटीस क्र.५/२०१४-१५ प्रसिध्द करुन १ वर्ष कालावधीकरीता निविदा मागविणेत आल्या होत्या. कामगारांचे वेतन व भत्ते र.रु.१,६९,४६,६१२/- + सेवाशुल्क र.रु.१६,९४,६६१/- अशी एकूण र.रु.१,८६,४१,२७३/- एवढी निविदेची अंदाजपत्रकीय किंमत आहे. निविदेसाठी सेवाशुल्क रकमेवर पात्रता हा निकष ठेवणेत आला होता. त्यानुसार मे. सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांनी सेवाशुल्काच्या ८१.५०% कमी दराने (र.रु.३,१३,५१०/-) व एकूण निविदा रकमेच्या ७.४१% कमी दराने निविदा सादर केली होती. सदरचे दर लघुत्तम असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "ड" क्षेत्रीय कार्यालयांतर्गत दिनांक २३/०७/२०१६ अखेर ठेकेदार म्हणून नेमणूक करणेत आली होती. तदनंतर दि.२४/७/२०१६ ते दि.२/१/२०१७ व दि.३/१/२०१७ ते दि.३०/४/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस अनुक्रमे मा. स्थायी समिती ठराव क्रं.१७१०५ दिनांक ६/९/२०१६ व ठराव क्रं.२२६, दिनांक १९/०४/२०१७ अन्वये मुदतवाढ देणेस मान्यता मिळाली आहे. सदर कामाची मुदत दि.३०/४/२०१७ अखेर संपुष्टात येणार आहे.

सध्या संस्थेमार्फत ५६ वाहनचालक, ६ सुपरवायजर व ९४ कामगार उपलब्ध करुन कामकाज सुरु आहे. याकामाची नविन निविदा कार्यवाही सुरु करणेत आली आहे. त्यास काही महिने कालावधी लागणार आहे. त्यामुळे मे. सावित्री महिला स्वंयरोजगार सेवा सह. संस्था मर्या. यांची ठेकेदार म्हणून दिनांक १/५/२०१७ ते दिनांक ३१/०८/२०१७ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे र.रु.७३,१०,०७१/- अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय**-दिनांक १/५/२०१७ ते दिनांक ३१/०७/२०१७ अखेर मुदतवाढ देणेस व याकामी होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७७ विषय क्रमांक – ११
दिनांक – १७/०५/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/१७१/२०१७ दि.११/०५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “फ” क्षेत्रीय कार्यालयातील म.न.पा. चे TATA ACE वाहनामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे व संकलन कैंद्र येथे वाहुन नेणेचे कामासाठी उपलब्ध वाहनांवर ६० वाहन चालक, ३ सुपरवायझर व १०६ कामगार पुरविणे कामी ई-निविदा नोटीस क्र.६/२०१४-१५ प्रसिध्द करुन १ वर्ष कालावधीकरीता निविदा मागविणेत आल्या होत्या. सदरची निविदा किमान वेतन दराच्या असुन यामध्ये अंदाजपत्रक तयार करताना कामगारांचे वेतन व भत्ते यापोटी देय असणारी रक्कम ९०% असुन निविदाधारकांना सेवाशुल्क म्हणून १०% असे रकमेचे विभाजन करणेत आले होते. यामध्ये कामगारांचे वेतन व भत्ते र.रु.१,९०,६३,०५२/- + सेवाशुल्क र.रु.१९,०६,३०५/- अशी एकूण र.रु.२,०९,६९,३५७/- एवढी निविदेची अंदाजपत्रकीय किंमत आहे. मे. भारतीय महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांनी सेवा शुल्काच्या ८३.००% कमी दराने (र.रु.३,२४,०००/-) व एकूण निविदा रकमेच्या ७.५४% कमी दराने निविदा सादर केली होती. सदरचे दर लघुत्तम असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “फ” क्षेत्रीय कार्यालयांतर्गत कामासाठी ठेकेदार म्हणून दिनांक २३/०७/२०१६ अखेर ठेकेदार म्हणून नेमणूक करणेत आली होती. तदनंतर दि.२४/७/२०१६ ते दि.३१/१२/२०१६ पर्यंत व दि.१/१/२०१७ ते दि.३०/४/२०१७ पर्यंत मुदतवाढ देणेस मा. स्थायी समितीची अनुक्रमे ठराव क्रं.१७१०६ दिनांक ६/९/२०१६ व ठराव क्रं.२०१३५, दिनांक १०/१/२०१७ अन्वये मान्यता मिळाली होती. सदर कामाची मुदत दि.३१/१२/२०१६ अखेर संपुष्टात येणार आहे. याकामाची नविन निविदा कार्यवाही सुरु असून, त्यास काही महिने कालावधी लागणार आहे. त्यामुळे मे. भारतीय महिला स्वंयरोजगार सेवा सह. संस्था मर्या. पिंपरी यांची ठेकेदार म्हणून दिनांक १/५/२०१७ ते दिनांक ३१/०८/२०१७ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च र.रु.७९,०२,२३२/- अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय-** ठेकेदाराने प्रत्येक कामगाराचा पी.एफ. भरला का नाही हे तपासल्याशिवाय मुदतवाढ

दिलीतर सदस्यांवर आरोप केले जातात. कामगारांचा पी.एफ. भरला नाही म्हणून मुदतवाढ दिली नव्हती. पालक संस्था (पेरेण्ट ऑर्गनायझेशन) म्हणून हे पाहणे आपली जबाबदारी आहे. आपण या संस्थांचे हित राखण्यासाठी काम करतो का महापालिकेचे हित राखण्यासाठी काम करतो? या संस्थांना गरीब कामगाराचे ह्ति राखता येत नसेलतर त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा व त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी. या-या संस्थेने कामगारांचा पी.एफ. भरलेला नाही, असे स्टेटमेंट विभागांकडून वर्तमानपत्रांत छापून आले पाहीजेत. आज स्थायी समितीच्या अनेक मिटींग्ज् मधून या विषयावर चर्चा झाली आहे. तरीसुद्धा कामगारांचा पी.एफ भरला का नाही याचा डाटा अधिका-यांकडे उपलब्ध नाही. कोणालातरी पोसण्यासाठी महापालिका काम करत नाही. कामगारांना त्यांच्या कामाचा पी.एफ. मिळाला पाहिजे. सगळ्या संस्थांना नोटीस बजवावी. नवी मुंबई, वसई-विरार मधून या कामगारांच्या बँक खात्यातून परस्पर पैसे काढून घेतले जातात. या कामगारांना पी.एफ., ई.एस.आय. या सुविधा मिळाल्या पाहीजेत. मा.आयुक्त यांनी परिपत्रक काढले आहे, मा.अति.आयुक्त यांनी देखील यापूर्वी परिपत्रक काढले होते. तरीदेखील अंमलबजावणी होत नाही. दि.३१ जुलै २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. ३१ जूलैच्या आत निविदा प्रोसेस पूर्ण झाली पाहीजे.

स्थायी समिती आदेश देते की, महापालिकेतील ठेकेदारी/कंत्राटी संस्थांमध्ये काम करणा-या प्रत्येक कामगाराच्या नावापुढे पी.एफ. जमा झाला आहे का नाही ते तपासावे. कामगारांचा हजेरी पट तपासावा आणि पी.एफ. जमा झाल्या नसल्याचे आढळून आल्यास त्या संबंधित संस्थेवर फौजदारी दाखल करावी. ठेकेदाराच्या नावाने पी.एफ नंबर असण्याबरोबरच कामगाराच्या नावाने देखील पी.एफ. नंबर असला पाहीजे. महापालिका प्रति कामगार रु.१२,८००/- इतके देते. परंतू प्रत्यक्षात या कामगारांना पगार मिळत नाही. ठेकेदाराची फायनान्शियल कुवत काय आहे ते तपासावे. मा.दंडवते साहेबांनी मा.इंदलकर साहेबांकडून कामगारांची यादी घ्यावी. कामगारांना जे आय-कार्ड इश्यू करतो त्याच्या फोटोकॉपीज् घ्याव्यात मा.इंदलकर साहेब, आपण महापालिकेत किती ठेकेदार आहेत, एकूण किती कंत्राटी कामगार आपल्याकडे काम करीत आहेत, त्यांना ठेकेदाराकडून सुरक्षितता दिली जाते का नाही, कशाप्रकारे सुरक्षितता दिली जाते, त्यांचा पी.एफ., ई.एस.आय. भरतो का नाही, याची माहिती सगळ्या विभागांकडून घ्यावी. यात ताबडतोब लक्ष घालून एक ते दीड आठवड्यांत याचा अहवाल द्यावा. पुढील महिन्यांत पहिल्या आठवड्यात दोन/तीन ठिकाणी फौजदारी दाखल करावी. दिनांक १/५/२०१७ ते दिनांक ३१/०७/२०१७ अखेर मुदतवाढ देणेस व याकामी होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक – ३७८ विषय क्रमांक – १२

दिनांक – १७/०५/२०१७

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक-मा.आशा धायगुडे-शेंडगे

संदर्भ:- मा.माधुरी कुलकर्णी, मा.आशा धायगुडे-शेंडगे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतिक आणि कला धोरण तयार करणेत आले असून सदर धोरणास मा.महापालिका सभेने ठराव क्र.४२३ दि.१८/०१/२०१४ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार अहिरानी साहित्य संमेलन आयोजित करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७९ विषय क्रमांक – १३

दिनांक – १७/०५/२०१७

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक-मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.अनुराधा गोफणे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

म.न.पा.च्या वतीने भोसरी येथे सखुबाई गवळी उद्यान आळंदी रोड भोसरी येथे व्यायाम शाळा चालविली जाते. म.न.पा.ची सखुबाई गवळी उद्यान व्यायाम शाळा, आळंदी रोड, भोसरी येथील व्यायाम शाळा व ध्यान मंदिर संस्कृती महिला स्वयंरोजगार संस्था, भोसरी, पुणे ३९ ही संस्था ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/- मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास घेण्यास इच्छुक आहे. सबब, मनपाच्या सखुबाई गवळी उद्यान आळंदी रोड, भोसरी येथील व्यायामशाळा व ध्यान मंदिर संस्कृती महिला स्वयंरोजगार संस्था, भोसरी संस्था, पुणे ३९ या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/३९/२०१७
दिनांक - २५/०५/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.